Affiliation / Registration Code No. : 10
Institute Code : LBP

" Education through self - help is our motto " - Karmveer

GST No.-27AAATT1566E1ZJ



Rayat Shikshan Sanstha's
**Laxmibai Bhaurao Patil Mahila Mahavidyalaya, Solapur.** Estd. 1989



■ (Arts, Commerce & Science) ■ REACCREDITED BY NAAC WITH 'A' GRADE (Affiliated to P. A. H. Solapur University, Solapur)

Founder : DR. PADMABHUSHAN KARMAVEER BHAURAO PATIL, D. Lit.
1428, Modikhana, Near Sata Rasta, Solapur - 413 001 Phone - (0217) 2620602
Website - www.lbpmsolapur.org E-mail - lbpmsolapur@yahoo.co.in

Principal : Dr. Suresh Dhere, M.Com, M.Phil, Ph.D. H.S.C. Index No. J-24-09-119

# News
# Year 2019-20

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सुराज्य
सोलापूर

दि. ३० नोव्हेंबर, २०१९

# पाटील महाविद्यालयात फुले यांना अभिवादन

सोलापूर : रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात आद्य समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. डी.जे. साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. देवराव मुंडे, डॉ. विजय रेवजे, प्रा.दशरथ रसाळ, डॉ. मनीषा टांक, डॉ. नागोराव भुरके उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

संचार

dailysanchar@gmail.com

दि. २९ नोव्हेंबर, २०१९

# फुले यांच्या विचारांचा वारसा जोपासावा

सोलापूर, दि. २८- महात्मा जोतिराव फुले यांचे शैक्षणिक कार्य आणि स्त्री उध्दाराच्या क्रांतिकारक योगदानामुळे पुरोगामी महाराष्ट्राची जडणघडण झाली. त्यांच्या विचारांचा वारसा आज जपण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. देवराव मुंडे, डॉ. विजय रेवजे, प्रा. दशरथ रसाळ, डॉ. मनीषा टांक, डॉ. नागोराव भुरके आदी उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. २९ नोव्हेंबर, २०१९

## जागतिक वारसा सप्ताह उत्साहात

**सोलापूर :** सात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात जागतिक वारसा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. जगातील ऐतिहासिक व भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असलेली स्थळे युनेस्कोद्वारा जागतिक वारसा म्हणून जाहीर केली जातात. अशा जागतिक वारशाचे जतन व संवर्धनासंदर्भात जाणीवजागृती करण्यासाठी १९ ते २५ नोव्हेंबर हा कालावधी जागतिक वारसा सप्ताह म्हणून युनेस्को साजरा करते. या सप्ताहाच्या निमित्ताने महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने युनेस्को व भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागनिर्मित 'अजंठा' व 'हंपी'वरील माहितीपट विद्यार्थिनींना दाखविण्यात आला. तसेच इतिहास विद्यार्थी अभ्यास मंडळाच्या वतीने संपादित 'भारतातील जागतिक वारसा स्थळे' या विषयावरील भित्तिपत्रिकेचे उद्‍घाटन प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. देवराव मुंडे, डॉ. विजय रेवजे, प्रा. दशरथ रसाळ, प्रा. संतोष मारकवाड हे उपस्थित होते. हे उपक्रम यशस्वी करण्यासाठी विभागातील प्रतीक्षा माने, प्रतीक्षा नन्नावरे, शुभांगी उडाणशिवे, सुप्रिया तांबे, राणी लोखंडे, स्मिता बिराजदार, प्रतीक्षा गायकवाड, प्रिया चव्हाण, वैशाली गायकवाड, ऋतुजा गायकवाड, आरती चेंडके, लक्ष्मी कसबे, वैष्णवी पाटील आदींनी पुढाकार घेतला.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. २९ नोव्हेंबर, २०१९



सोलापूर : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. देवराव मुंडे, डॉ. विजय रेवजे, प्रा. ए. पी. कोबळे, डॉ. मनीषा टांक, डॉ. नागोराव भुरके, ए. एस. इंगोले आदी.

# लक्ष्मीबाई पाटीलमध्ये महात्मा फुले यांना अभिवादन

**सोलापूर :** सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात आद्य समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे यांनी मनोगत व्यक्त करताना महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांचा वसा आणि वारसा जोपासण्याची गरज व्यक्त केली. महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य आणि स्त्री उद्धाराच्या क्रांतिकारक योगदानामुळे आजच्या पुरोगामी महाराष्ट्राची जडणघडण झाल्याची भूमिका त्यांनी मांडली. यावेळी उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. देवराव मुंडे, डॉ. विजय रेवजे, प्रा. दशरथ रसाळ, डॉ. मनीषा टांक, डॉ. नागोराव भुरके तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सोलापूर तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित

दि. २९ नोव्हेंबर, २०१९



# पाटील कॉलेजात जागतिक वारसा सप्ताह

**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात जागतिक वारसा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. जगातील ऐतिहासिक व भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असलेली स्थळे युनेस्कोद्वारा जागतिक वारसा म्हणून जाहीर केले जातात. अशा जागतिक वारस्याचे जतन व संवर्धनासंदर्भात जाणीव जागृती करण्यासाठी १९ ते २५ नोव्हेंबर हा कालावधी जागतिक वारसा सप्ताह म्हणून युनेस्को साजरा करते. या सप्ताहाच्या निमित्ताने महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने युनेस्को व भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग निर्मित अजंठा व हंपी वरील माहिती पट विद्यार्थिनींना दाखविण्यात आला. तसेच इतिहास विद्यार्थी अभ्यास मंडळाच्या वतीन संपादित भारतातील जागतीक वारसा स्थळे या विषयावरील भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ.डी.जे.साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. उपप्राचार्य डॉ.रावसाहेब ढवण, प्रा.देवराव मुंडे, डॉ.विजय रेवजे, प्रा.दशरथ रसाळ, प्रा.संतोष मारकवाड उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
**पुढारी**
स्थापना १९३९
www.pudhari.com

दि. ३ ऑक्टोबर, २०१९



सोलापूर : नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. नवनीत तोष्णीवाल उपस्थितांना मार्गदर्शन करताना.

# कर्मवीरांनी जग सुंदर केले : डॉ. नवनीत तोष्णीवाल

**सोलापूर : प्रतिनिधी**

समाजाला खरी ज्ञानदृष्टी देऊन जग आणि जीवन सुंदर करण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांच्या रयत शिक्षण संस्थेने केले असल्याचे मत डॉ. नवनीत तोष्णीवाल यांनी केले.

सात रस्ता मोदीखाना येथे लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.जे. साळुंखे यांनी केले. यावेळी वक्तृत्व, निबंध ग्रंथ, परीक्षण, मेहंदी, पाककला, रांगोळी, सामान्य ज्ञान स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थिनींना पारितोषिक देण्यात आले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांनी करून दिला. प्रा. देवराव मुंडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सुराज्य
सोलापूर

दि. १ ऑक्टोबर, २०१९

## कर्मवीरांनी जग, जीवन सुंदर केले : डॉ. तोष्णीवाल

**सोलापूर, ता. ३० :** समाजाला खरी ज्ञानदृष्टी देऊन आणि जीवन सुंदर करण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांच्या रयत शिक्षण संस्थेने केले, असे प्रतिपादन डॉ. नवनीत तोष्णीवाल यांनी केले.

सातरस्ता, मोदीखाना येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास, ज्येष्ठ उद्योजक अशोक पाटील, प्राचार्य डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, मुख्याध्यापिका नीलिमा शिरसाठ हे होते. डॉ. राजेंद्र दास म्हणाले, ''कर्मवीर भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून महाराष्ट्रातील सामान्य माणसाला जागे केले. अन्याय, अज्ञान आणि अंधकारात खितपत पडलेल्या समाजाला ज्ञानदृष्टी देऊन आधुनिक महाराष्ट्र घडविला. मन, मनगट, मेंदू बळकट करून नवे जग निर्माण करण्याची प्रेरणा समाजाला दिली. कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या त्यागातून निर्माण झालेल्या संस्थेला १०० वर्षे पूर्ण होणे क्रांतिकारक घटना आहे.'' उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. देवराव मुंडे यांनी सूत्रसंचालन केले.

**लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर**
**प्रसिद्धी विभाग**

**लोकमत** — महाराष्ट्राचा मानबिंदू

**दि. ३ सप्टेंबर, २०१९**

गिरीश जाखोटिया : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात व्याख्यान

# संकटांना सामोरे जाण्यासाठी विवेक ही गुरुकिल्ली

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : जीवन जगत असताना अनेक सामाजिक व आर्थिक अडचणी येत असतात. विज्ञान व विवेकाची गुरुकिल्ली वापरुन आनंदाने सामोरे गेल्यास या अडचणी सोडवता येऊ शकतात, असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ डॉ. गिरीश जाखोटिया यांनी केले.

सातरस्ता येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'यशस्वी उद्योगाची गुरुकिल्ली' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. या वेळी व्यासपीठावर संस्थेच्या मध्य विभागीय सल्लागार समितीचे अध्यक्ष संजीव पाटील, प्राचार्य डी. जे. साळुंखे, डॉ. रावसाहेब ढवण उपस्थित होते.

डॉ. जाखोटिया म्हणाले, प्रत्येकाच्या यशाची वाट वेगळी असते. यशाचे आर्थिक, बौद्धिक, सांस्कृतिक व सामाजिक असे चार भाग पडतात. उद्योगात यशस्वी होण्यासाठी बुद्ध्यांक, भावनांक, शक्तांश आवश्यक असते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना संजीव पाटील म्हणाले, एकविसावे शतक हे भारतासाठी संधीचे शतक आहे. यशस्वी होण्यासाठी जात, धर्म, पंथ यांचे अडसर राहिलेले नाही. ज्ञानी होऊन व आपापल्या क्षेत्रात सर्वोत्तम कौशल्य हस्तगत करून यश मिळविता येते. सध्या जागतिक बदलांमुळे मुलींसाठी खूप संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने या संधी काबीज करायला व्हव्यात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे व प्रा. देवराव मुंडे यांनी केले. डॉ. रावसाहेब ढवण यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी आणि अर्थ क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.



अर्थतज्ज्ञ डॉ. गिरीश जाखोटिया यांचा सत्कार करताना उपस्थित संजीव पाटील, प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे आदी मान्यवर.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. ५ सप्टेंबर, २०१९

## ‘ल. भा. पाटील’मध्ये बेत यांचे व्याखान

**सोलापूर** : ल. भा. पाटील महिला महाविद्यालयात प्रा. विलास बेत यांचे व्याख्यान झाले. महाविद्यालयातील महिला विकास समिती व अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या उद्‌घाटनानंतर त्यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी संजीव माळवदकर, प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंके, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. निलोफर तांबोळी, डॉ. मनीषा टांक, प्रा. सुकेशिनी कांबळे, प्रा. अरुणा कोडम, प्रा. वृषाली सापटणेकर उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

संचार

dailysanchar@gmail.com

दि. ५ सप्टेंबर, २०१९

# महिलांमध्ये स्वतंत्र विचार करण्याची शक्ती निर्माण होणे गरजेचे : प्रा. बेत

सोलापूर, दि. ४- महिलांमध्ये स्वतंत्र विचार व कृती करण्याची शक्ती निर्माण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रा. विलास बेत यांनी केले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात महिला विकास समितीच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

व्यासपीठावर त्यांच्यासमवेत संजीव माळवदकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जे साळुंके, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. नीलोफर



तांबोळी उपस्थित होते.

यावेळी बेत म्हणाले की, महिलांना तडजोडी करत जीवन जगत असताना स्वातंत्र्य उपभोगता येत नाही. त्यामुळे जीवनातील विविध तणाव व समस्यांवर मात करण्यासाठी त्यांच्यामध्ये स्वतंत्र विचार व कृती करण्याची शक्ती निर्माण होणे गरजेचे आहे.

डॉ. रावसाहेब ढवण अध्यक्षीय भाषण करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी व्यवहार आणि शिक्षणाची सांगड घातली पाहिजे. त्यामुळे समाजामध्ये त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल. यावेळी डॉ. मनीषा टांक, प्रा. सुकेशनी कांबळे, प्रा. अरुणा कोडम, प्रा.वृक्षाली सापटणेकर व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. इंदुमती चोळ्ळे यांनी तर आभार प्रा. तांबोळी यांनी मानले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

दि. ५ सप्टेंबर, २०१९

संक्षिप्त



सोलापूर : यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत उपस्थित शिक्षक.

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश

**सोलापूर :** स्वाभिमानी शेतकरी संघटना व संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या स्व. वसंतराव आपटे वक्तृत्व स्पर्धेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. प्रथम प्राजक्ता नवनाथ भिसे व ऐश्वर्या अविनाश सरडे या विद्यार्थिनींनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले आहे. या विद्यार्थिनींना प्रा. मोनिका ढावरे, प्रा. आश्विनी गोरे, प्रा. रेश्मा सरवदे, प्रा. मुग्धा जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवणे यांनी अभिनंदन केले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

दि. ५ सप्टेंबर, २०१९



सोलापूर : डॉ. गिरीश जाखोटिया यांचे स्वागत करताना प्राचार्य डी.जे. साळुंखे आदी.

## विज्ञान, विवेकाच्यादृष्टीने आर्थिक संकटांना सामोरे जा : डॉ. जाखोटिया

**सोलापूर :** जीवन जगत असताना अनेक सामाजिक व आर्थिक अडचणी निर्माण होत असतात. अशा अडचणींना आनंदाने सामोरे जाऊन विद्यार्थिनींनी विज्ञान आणि विवेकाच्यादृष्टीने आर्थिक संकटांना सामारे जाण्याचे आवाहन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व उद्योजकीय सल्लागार डॉ. गिरीश जोखोटिया यांनी केले. सात रस्ता, मोदीखाना येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त 'यशस्वी उद्योगाची गुरूकिल्ली' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डी. जे. साळुंखे, डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. देवराव मुंडे आदी उपस्थित होते.

संचार

dailysanchar@gmail.com

दि. ६ सप्टेंबर, २०१९

# लक्ष्मीबाई महाविद्यालयात वाणिज्यचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ५-** लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उद्घाटन अश्विनी दोशी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रावसाहेब ढवण उपस्थित होते. यावेळी दोशी यांनी चार्टर्ड अकौंटंट परीक्षेविषयी मार्गदर्शन करत वाणिज्य विद्यार्थ्यांना सी.ए. म्हणून चांगले करिअर करता येऊ शकते, असे सांगत वाणिज्य शाखेतील करिअरच्या संधीबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. ढवण यांनी विद्यार्थ्यांनी करिअर घडविताना जिद्द, चिकाटी, प्रेरणा, सातत्य व स्वयंशिस्त आदी गुण आत्मसात करावे, असे सांगितले. प्रास्ताविक इंदूमती चोळ्ळे यांनी केले. प्रा. अरूणा कोडम यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रा. सुनील माने यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. बी. डी. जाधव यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

# तरुण भारत

दि. ६ सप्टेंबर, २०१९

## पाटील कॉलेजमध्ये वाणिज्य मंडळाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उदघाटन अश्विनी दोशी यांच्याहस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण उपस्थित होते.

दोशी यांनी चार्टर्ड अकाऊंट परीक्षेविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. डॉ. रावसाहेब ढवण म नोगतात म्हणाले की, विद्यार्थिनींनी करीअर घडविण्यासाठी जिद्द, चिकाटी, प्रेरणा सातत्य व स्वयंशिस्त आदी गुणांचा संग्रह करावा.

प्रास्ताविक प्रा. इंदुमती चोळ्ळे यांनी परिचय प्रा. अरुणा कोडम यांनी केले तर आभार प्रा. सुनील माने यांनी मानले. प्रा. बी.डी. जाधव यांनी परिश्रम घेतले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

दि. ६ सप्टेंबर, २०१९



सोलापूर : तक्रार निवारण समितीच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. विलास बेत.

# भाऊराव पाटील महिला विद्यालयात तक्रार निवारण समितीची स्थापना

**सोलापूर :** लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात महिला विकास समिती व अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. विलास बेत म्हणाले की, तडजोडी करत जीवन जगल्यामुळे महिलांना स्वातंत्र्य उपभोगता येत नाही. त्यामुळे जीवनातील विविध तणाव व समस्यांवर मात करण्यासाठी महिलांमध्ये स्वतंत्र विचार व कृती करण्याची शक्ती निर्माण होणे गरजेचे आहे. यावेळी संजीव माळवदकर, प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. निलोफर तांबोळी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. इंदुमती चोळ्ळे यांनी केले. आभार प्रा. निलोफर तांबोळी यांनी मानले. यावेळी डॉ. मनीषा टांक, प्रा. सुकेशनी कांबळे, प्रा. अरुणा कोडम, प्रा. वृषाली सापटणेकर आदी उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. ७ सप्टेंबर, २०१९

# 'जागतिक दर्जाचे संशोधन घडावे'

**सोलापूर** : शिक्षकांच्या हातून जागतिक दर्जाचे संशोधन घडावे, अशी अपेक्षा माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर यांनी व्यक्त केली. सातरस्ता येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात शिक्षकदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, डॉ. रावसाहेब ढवण, देवराव मुंडे, इंदुमती चोळ्ळे उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. ७ सप्टेंबर, २०१९

## 'ल. भा. पाटील'मध्ये वाणिज्य विभाग सुरू

**सोलापूर :** सातरस्ता येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उद्घाटन अश्विनी दोशी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. इंदुमती चोळ्ळे यांनी केले. प्रा. सुनील माने यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. बी. डी. जाधव परिश्रम घेतले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

दि. ७ सप्टेंबर, २०१९

# पाटील महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उद्‌घाटन

सोलापूर : सातरस्ता येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उद्‌घाटन सीए अश्विनी दोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण उपस्थित होते. याच कार्यक्रमात चार्टर्ड अकौंटंट परीक्षेविषयी विद्यार्थिनींनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी करिअर घडविण्यासाठी जिद्द, चिकाटी, प्रेरणा, सातत्य व स्वयंशिस्त आदी गुणांचा संग्रह करावा असे मत ढवण यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. इंदुमती चोळ्ळे, पाहुण्यांचा परिचय प्रा. अरुणा कोडम, आभार प्रा. सुनील माने, प्रा. बी. डी. जाधव यांनी मानले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

दि. २५ सप्टेंबर, २०१९

# भाऊराव पाटील यांना अभिवादन





कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन करताना रवींद्र सरवदे, प्राचार्य जाधव, सचिन वाघमारे, सुधाकर गुंडेली, मदन वडावराव, समीर नदाफ, सागर बाबरे, दिनेश होळकर, वरुण सोनकांबळे आदी. दुसऱ्या छायाचित्रात महिला महाविद्यालयाच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त रॅलीचा शुभारंभ उल्का पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रांमधील मान्यवरांनी आणि शाळा-महाविद्यालयांत मुला-मुलींनी अभिवादन केले. जयंतीचे औचित्य साधून विविध उपक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. सम्राट चौकातील कर्मवीरांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी गर्दी झाली होती.

**एलबीपी महाविद्यालय**

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील (एलबीपी) महिला महाविद्यालयाच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त रॅली काढण्यात आली. लक्ष्मी उद्योग समूहाच्या संचालिका उल्का पाटील यांच्या हस्ते रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, डॉ. संतोष राजगुरु, डॉ. मनीषा टांक आदी उपस्थित होते. ही रॅली मोदीखाना, रेल्वे स्टेशन, डफरीन चौक, जुना एम्प्लॉयमेंट चौक, संगमेश्वर महाविद्यालय, सातरस्ता या मार्गावरुन काढण्यात आली.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. २५ सप्टेंबर, २०१९

## डॉ. धामणस्कर यांचा सत्कार

**सोलापूर :** शिक्षण सहसंचालक डॉ. राजेंद्र धामणस्कर यांचा ल. भा. पाटील महिला महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंके, प्राचार्य डॉ. अशोक भोईटे, डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष राजगुरू यांनी आभार मानले. या वेळी डॉ. मनीषा टांक, प्रा. संतोष मारकवाड, प्रा. भैरवनाथ जाधव, प्रा. भक्तराज जाधव, सूर्यकांत विजापुरे, प्रा. नितेश गंगावे, प्रा. मोनाली डावरे, प्रा. किरण भोसले उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

दि. ३० सप्टेंबर, २०१९

# लायन्स क्लबतर्फे सायकल भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील गरजू विद्यार्थिनींसाठी लायन्स क्लब सोलापूर सेंट्रलकडून दोन सायकली भेट देण्यात आल्या. महाविद्यालयाने या सायकली कमवा व शिका योजना समितीचे प्रमुख डॉ. विजय रेवजे यांच्याकडे सुपूर्द केल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, प्राचार्य डॉ. अशोक भोईटे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण, राजू चौधरी, यशवंत सिद्राल, नीलेक्ष बक्षी, चंद्रकांत यादव, उमेश उकरंडे, सुधाकर कोळी उपस्थित होते. सायकली दिल्याबद्दल प्राचार्य डॉ. साळुंखे व डॉ. ढवण यांनी लायन्स क्लबचे आभार मानले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

संचार

dailysanchar@gmail.com

दि. ३० सप्टेंबर, २०१९

# कर्मवीरांनी नवे जग निर्माण करण्याची प्रेरणा दिली

शहर संचार

सोलापूर, दि.२९- कर्मवीर भाऊराव पाटलांनी अज्ञान आणि अंध:कारात खितपत पडलेल्या समाजाला ज्ञानदृष्टी देऊन त्यांचे मन, मेंदू व मनगट बळकट केले. नवे जग निर्माण करण्याची प्रेरणा त्यांनी समाजाला दिली, असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. राजेंद्र दास यांनी काढले.

सातरस्ता मोदीखाना येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३२ [illegible]ा जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. दास बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रसिध्द नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. नवनीत तोष्णीवाल हे होते. या प्रसंगी ज्येष्ठ उद्योजक अशोक पाटील, मुख्याध्यापिका निलीमा शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांनी करून दिला. प्रा. डॉ. दास पुढे म्हणाले, कर्मवीरांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेला शंभर वर्षे पूर्ण होणे ही क्रांतिकारक घटना असून आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा मिळाला आहे. रयत ही लोकसेवेसाठी समर्पित झालेली संस्था असून कर्मवीरांनी सामान्यातला सामान्य माणसाला जागे करण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून केले आहे. यावेळी ज्येष्ठ उद्योजक पाटील यांनीही मनोगत व्यक्त करून महाविद्यालयाची भविष्यातील दिशा स्पष्ट केली. वक्तृत्व, निबंध, ग्रंथपरीक्षण, मेहंदी, रांगोळी, सामन्य ज्ञान आदी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्[illegible] देवराव मुंडे यांनी केले.




सोलापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा.डॉ. राजेंद दास यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. नवनीत तोष्णीवाल, डॉ. डी. जे. साळुंखे व अन्य.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

दि. ३ ऑगस्ट, २०१९

# स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी चिंतनाची आवश्यकता-सूर्यवंशी

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासाबरोबरच मनन व चिंतनाची आवश्यकता असते. समज वाढविण्यासाठी वृत्तपत्रे आणि संपादकीय पानावरील वाचनाचा व्यासंग जोपासावा, असा सल्ला उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी दिला. एलबीपी महिला महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे होते. प्रारंभी उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांनी प्रास्ताविक केले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

संचार
dailysanchar@gmail.com

दि. ४ ऑगस्ट, २०१९



▶ सोलापूर : लक्ष्मीबाई महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, डॉ. रावसाहेब ढवण व अन्य.

# स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासाबरोबर चिंतन हवे

## लक्ष्मीबाई महाविद्यालयात 'रासेयो'चे उद्घाटन

शहर संचार

▶ सोलापूर, दि. ३- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाताना अभ्यासाबरोबरच मनन व चिंतनाकडे लक्ष देऊन या परीक्षांची परिपूर्ण तयारी केली पाहिजे, असे मत उपजिल्हाधिकारी तथा मोहोळचे विशेष भूसंपादन अधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

सात रस्ता येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.जे. साळुंखे हे होते. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांनी केले व पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी सूर्यवंशी म्हणाले, मन, मेंदू मनगट, बळकट करत महाविद्यालयाच्या छत्राखाली समाजसेवा करण्याची संधी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्राप्त होते. आजचा काळ आव्हानात्मक असून ही आव्हाने पेलण्याची क्षमता या योजनेद्वारे निर्माण होते. तसेच आकलन क्षमता वाढविण्यासाठी विविध वृत्तपत्रांचे व त्यातील संपादकीय लेखन नियमित वाचले पाहिजे. डॉ. साळुंखे यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृती करणारी योजना असून यातून संस्कारक्षम विद्यार्थी घडू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. नागोराव भुरके, डॉ. आनंद शिंदे, प्रा. ए.पी. कांबळे, प्रा. दशरथ रसाळ, डॉ. मनीषा टांक, प्रा. निलोफर तांबोळी यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देवराव मुंडे यांनी केले. तर आभार डॉ. विजय रेवजे यांनी मानले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

**पुढारी**

www.pudhari.com

दि. ६ ऑगस्ट, २०१९



सोलापूर : लक्ष्मीबाई पाटील महाविद्यालयात रासेयो कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. दादासाहेब साळुंखे व अन्य.

## 'अभ्यासाबरोबरच मनन, चिंतन गरजेचे'

**सोलापूर :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जात असताना अभ्यासाबरोबरच मनन व चिंतनाकडे लक्ष दिले पाहिजे. या परीक्षांची बहुआयामी तयारी करून आपली आकलनक्षमता वाढविण्यासाठी वृत्तपत्रे व त्यातील संपादकीय लेखन नियमितपणे वाचले पाहिजे, असे विचार उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. सातरस्ता येथील रयत शिक्षण संस्थेच्या, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे हे होते. या कार्यक्रमास डॉ. नागोराव भुरके, डॉ. आनंद शिंदे, प्रा. ए. पी. कांबळे, प्रा. दशरथ रसाळ, डॉ. मनिषा टांक, प्रा. निलोफर तांबोळी आदी प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

सकाळ

दि. ६ ऑगस्ट, २०१९

## डॉ. धामणस्कर यांचा सत्कार

**सोलापूर** : शिक्षण सहसंचालक डॉ. राजेंद्र धामणस्कर यांचा ल. भा. पाटील महिला महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंके, प्राचार्य डॉ. अशोक भोईटे, डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष राजगुरू यांनी आभार मानले. या वेळी डॉ. मनीषा टांक, प्रा. संतोष मारकवाड, प्रा. भैरवनाथ जाधव, प्रा. भक्तराज जाधव, सूर्यकांत विजापुरे, प्रा. नितेश गंगावे, प्रा. मोनाली डावरे, प्रा. किरण भोसले उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

दि. ११ ऑगस्ट, २०१९



# पूरग्रस्तांसाठी हजारो कडक भाकऱ्या रवाना

## सोबतीला शेंगाचटणीही । मोटारमालक असोसिएशनतर्फे पाच हजार मास्क अन् मोजे

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सांगली, कोल्हापूर आदी पूरग्रस्त भागातील लोकांसाठी सोलापुरातून शेंगाचटणीसह हजारो कडक भाकऱ्या रवाना करण्यात आल्या आहेत. सकल मराठा समाजाकडून कडक भाकरी, ठेचा, शेंगाचटणी, पाण्याची बाटली अशी एक हजार पाकिटे लवकरच पूरग्रस्त भागात पाठवून देण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्हा मोटारमालक असोसिएशनच्या वतीने पाच हजार मास्क आणि हातमोजे शनिवारी सांगलीकडे रवाना करण्यात आले. शहर आणि जिल्ह्यातील मोटार मालक आणि ट्रान्स्पोर्ट चालकांनी अधिकाधिक मदत करण्यासाठी पुढे




यावे, असे आवाहन अध्यक्ष महादेव चाकोते, प्रकाश अवसेकर यांनी केले आहे. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाच्या वतीने नवीपेठ आणि परिसरात मदत रॅली काढण्यात आली. या रॅलीत ७० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या रॅलीत नागरिकांसह व्यापाऱ्यांनी आपला खारीचा वाटा उचलला. रॅलीत प्रा. देवराव मुंडे, डॉ. विजय रेवजे, प्रा. भक्तराज जाधव, प्रा. मोहन चव्हाण, डॉ. आनंद शिंदे, डॉ. नागोराव भुरके, प्रा. दशरथ रसाळ, प्रा. संतोष मारकवाड, प्रा. बी. डी. जाधव आदी सहभागी झाले होते.





पूरग्रस्त भागासाठी रवाना करण्यात आलेल्या कडक भाकऱ्या. एलबीपी महाविद्यालयातील मुलींनी मदतफेरी काढताना. तिसऱ्या छायाचित्रात जिल्हा मोटारमालक असोसिएशनच्या वतीने पाच हजार मास्क अन् मोजे सांगलीकडे रवाना करताना.

### लायन्स क्लबतर्फे १२, १३ रोजी मदतफेरी

- पूरग्रस्तांच्या मदतीसाठी लायन्स क्लब ऑफ सोलापूरच्या वतीने १२ आणि १३ ऑगस्ट रोजी मदतफेरी काढण्यात येणार असल्याचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांनी सांगितले. १२ ऑगस्ट रोजी सकाळी साडेनऊ वाजता चार हुतात्म्यांना अभिवादन करून फेरीस सुरुवात होणार आहे.
- ही मदतफेरी चार हुतात्मा पुतळा, सरस्वती चौक, लकी चौक, नवीपेठ, दत्त चौक, माणिक चौक, मधला मारुती, बाळीवेस, टिळक चौक, मीठ गल्ली, तुळजापूर वेस, कुंभार वेस, जोडभावी पेठ, कन्ना चौक येथून कोंतम चौकातील महात्मा बसवेश्वर सर्कलजवळ येऊन तेथे फेरीचा समारोप होणार आहे. १३ रोजी मार्केट यार्डात मदतफेरी काढण्यात येणार आहे. फेरीत जमा झालेले साहित्य, रोकड, धान्य पूरग्रस्तांना प्रत्यक्ष पोहोच करण्यात येणार असल्याचे हिंगमिरे यांनी सांगितले.

### महावितरणचे आठ पथक दाखल

सांगली आणि कोल्हापूर येथील पूरग्रस्त भागातील वीज यंत्रणा सुरळीत करण्यासाठी सोलापूर येथून ८ पथके रवाना झाली आहेत. प्रत्येक पथकात एक अभियंता, तीन वीज कर्मचारी आणि आठ कंत्राटी कामगार असतील.

पुरामुळे तेथील वीज यंत्रणा कोलमडली आहे. कोल्हापूर परिमंडळाच्या मदतीला शेजारच्या जिल्ह्यातून महावितरणचे अधिकारी, कर्मचारी धावून गेले आहेत. गेल्या दोन दिवसांमध्ये सोलापूर येथील महावितरणच्या पथकाकडून ६१ हजार ग्राहकांचा व पाच उपकेंद्रांचा वीजपुरवठा सुरळीत केला आहे मदतीचा ओघ सुरु असून, वि[illegible] संघटना यासाठी सरसाव[illegible]

### मंदिरात प्रार्थना

राज्यातील पूरग्रस्तांची लवकरात लवकर संकटातून मुक्तता व्हावी यासाठी वीरशैव समाजबांधवांनी श्री मन्मथेश्वर मंदिरात पूजा करून प्रार्थना केली. यावेळी संयोजक नरेंद्र गंभीरे, शिवानंद सावळगी, सिद्धारुढ निबाळे, विश्वनाथ बुरकुले, सिद्धाराम कोनापुरे, सिद्धाराम हिरेमठ, गणेश शीलवंत, मल्लिनाथ स्वट्टे, विजयकुमार बिराजदार, अप्पू तुगावकर, सिद्धेश्वर वाडी, मंगेश स्वामी, मल्लिनाथ जेऊरे, बसवराज स्वामी, नागनाथ माळगे, आप्पासाहेब नष्टे, नागनाथ लिगाडे आदी उपस्थित होते.

# तरुण भारत

दि. १२ ऑगस्ट, २०१९

## महिला महाविद्यालयाची पूरग्रस्त निधी

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट -**

लक्ष्मीबाई पाटील महिला महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी व प्राध्यापक यांनी पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला. पूरग्रस्तांसाठी जीवनावश्यक वस्तू, अन्न, निवारा, आरोग्यविषयक सुविधा, पुनर्वसन यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत. यात भर टाकत प्राचार्य डॉ.डी. जे.साळुंखे, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब ढावण यांनी ७0 विद्यार्थीनीच्या मदतीने सोलापूर शहरातील व्यापारी, दुकानदार, रिक्षा चालक, नागरिकांकडून निधी संकलन रॅलीच्या माध्यमातून निधी गोळा केला. उपक्रमात देवराव मुंडे, डॉ.विजय रेवजे, भक्तराज जाधव, मोहन चव्हाण, डॉ.आनंद शिंदे, डॉ.नागोराव भुरके, दशरथ रसाळ, संतोष मारकवाड, बी.डी.जाधव आदी प्राध्यापक यांचा सहभाग होता.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. १२ ऑगस्ट, २०१९

## पाटील महाविद्यालयात ऑगस्ट क्रांती दिन

**सोलापूर :** सात रस्ता येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात ऑगस्ट क्रांती दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते माऊली पवार उपस्थित होते. प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे अध्यक्षस्थानी होते. डॉ. रावसाहेब ढवण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बी. डी. जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. के. रसाळ यांनी आभार मानले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

दि. १९ ऑगस्ट, २०१९

# 'एलबीपी'मध्ये ग्रंथपाल दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील (एलबीपी) महिला महाविद्यालयात ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी ग्रंथालय शास्त्राचे जनक एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे यांनी वाचन चळवळी वाढवण्याचे आवाहन केले. ग्रंथपाल मनीषा टांक यांनी प्रास्ताविक केले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

दि. २१ ऑगस्ट, २०१९

## एलबीपी महाविद्यालयात काशिद यांचे व्याख्यान

सोलापूर : सात रस्ता येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला (एलबीपी) महाविद्यालयात राजकुमार काशिद यांचे व्याख्यान झाले. गरजा भागवण्याबरोबर स्पर्धेत टिकण्यासाठी पैसा महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. मुलींना क्रमिक अभ्यासक्रमाबरोबरच कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्यांची ओळख होणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले. यावेळी डॉ. रावसाहेब ढवण, डॉ. संतोष राजगुरू आदी उपस्थित होते.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

दैनिक दिव्य मराठी

दि. २५ ऑगस्ट, २०१९

# स्पर्धा परीक्षेमधील ध्येयाच्या पूर्तीसाठी सातत्यपूर्ण अभ्यासाची गरज : थोरात

## श्रीमंतयोगी प्रतिष्ठानतर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर

प्रतिनिधी | सोलापूर

स्पर्धा परीक्षा यशस्वी होण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आई- वडिलांच्या कष्टाचे चीज केले पाहिजे. ध्येयपूर्णतेसाठी धडपड महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन राज्य जीएसटी विभागाचे सहआयुक्त स्वाती थोरात यांनी आज येथे केले.



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरात बोलताना स्वाती थोरात.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानतर्फे स्पर्धा परीक्षा करिअर मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. त्यावेळी थोरात बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून दादासाहेब साळुंखे, प्रा. रावसाहेब धवण, प्रा. संतोष राजगुरू, प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट उपस्थित होते.

थोरात पुढे म्हणाल्या, अवांतर वाचनावर भर द्या. मिनिट टू मिनिट नियोजन करा. विद्यार्थिनींसाठी करिअर घडविण्याची उत्तम संधी आहे. शिक्षण ही सातत्यपूर्ण घटना आहे. स्पर्धा परीक्षेत पास किंवा नापास ही संकल्पना नाही तर पात्र किंवा अपात्र असते. प्रा. संतोष राजगुरू यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता साठे व मेघना बोंडगे यांनी सूत्रसंचालन केले. हर्षदा गवळी यांनी आभार मानले. शिबिर यशस्वितेसाठी शंकर बडगर, शुभम हंचाटे, राहुल बिराजदार, मयुर गवते यांनी परिश्रम घेतले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. २६ ऑगस्ट, २०१९



सोलापूर : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानतर्फे झालेल्या स्पर्धा परीक्षा करिअर मार्गदर्शन शिबिरात बोलताना सहायक आयुक्त स्वाती थोरात. या प्रसंगी उपस्थित विद्यार्थिनी.

# ध्येयपूर्तीसाठी सातत्यपूर्ण अभ्यास करा

## स्वाती थोरात; लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयात व्याख्यान

**सोलापूर, ता. २५ :** स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी ध्येय ठरवा. ध्येयपूर्तीसाठी सातत्यपूर्ण अभ्यास केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केले पाहिजे. संधीचे सोने करण्यासाठी धडपड महत्त्वाची असल्याचा सल्ला राज्य आयकरच्या (जीएसटी) सहायक आयुक्त स्वाती थोरात यांनी दिला.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानतर्फे झालेल्या स्पर्धा परीक्षा करिअर मार्गदर्शन शिबिरात त्या बोलत होत्या. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष दादासाहेब साळुंखे, प्रा. रावसाहेब ढवण, प्रा. संतोष राजगुरू, प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट आदी उपस्थित होते.

थोरात म्हणाल्या, अवांतर वाचनावर भर द्या. एका पदावर लक्ष केंद्रित करून आपले ध्येय साध्य करा. मिनीट टू मिनीट नियोजन करा. आई-वडिलांशी प्रामाणिक रहा. विद्यार्थिनींनी संधी गमावली नाही पाहिजे. शिक्षण ही सातत्यपूर्ण घटना आहे. स्पर्धा परीक्षा पास किंवा नापास ही संकल्पना नाही तर पात्र किंवा अपात्र असते. प्रा. संतोष राजगुरू यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता साठे, मेघना बोंडगे यांनी सूत्रसंचालन केले. हर्षदा गवळी यांनी आभार मानले. शिबिर यशस्वितेसाठ शंकर बंडगर, शुभम हंचाटे, रा बिराजदार, मयूर गवते आदींनी घेतले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

संचार

dailysanchar@gmail.com

दि. २७ ऑगस्ट, २०१९

# ध्येयपूर्तीसाठी सातत्यपूर्ण अभ्यासाची गरज

## 'श्रीमंतयोगी'तर्फे स्पर्धा परीक्षा करिअर मार्गदर्शन शिबिर

शहर संचार

सोलापूर, दि. २६- स्पर्धा परीक्षा यशस्वी होण्यासाठी ध्येय ठरवा. ध्येयपूर्तीसाठी सातत्यपूर्ण अभ्यास केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केले पाहिजे. संधीचे सोने करण्यासाठी धडपड महत्त्वाची आहे, असा सल्ला जीएसटी विभागाच्या सहायक आयुक्त स्वाती थोरात यांनी दिला.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानतर्फे आयोजित स्पर्धा परीक्षा करिअर मार्गदर्शन शिबिरात थोरात बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य दादासाहेब साळुंखे, प्रा. रावसाहेब ढवण, प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते.



सोलापूर : स्पर्धा परीक्षा करिअर मार्गदर्शन शिबिरात जीएसटी विभागाच्या सहायक आयुक्त स्वाती थोरात यांनी मार्गदर्शन केले.

थोरात पुढे म्हणाल्या, अवांतर वाचनावर भर देऊन एका पदासाठी फोकस करीत ध्येय साध्य करा. मिनीट टू मिनीट नियोजन करा. आई-वडिलांशी प्रामाणिक राहा. शिक्षण ही सातत्यपूर्ण घटना आहे. स्पर्धा परीक्षात पास किंवा नापास ही संकल्पना नाही तर पात्र किंवा आपात्र ही संकल्पना आहे.

प्रास्ताविक प्रा. संतोष राजगुरू यांनी केले. सूत्रसंचालन प्राजक्ता साठे, मेघना बोंडगे यांनी केले. आभार हर्षदा गवळी यांनी मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी शंकर बडगर, शुभम हंचाटे, राहुल बिराजदार, मयूर गवते आदींनी परिश्रम घेतले.

दैनिक दिव्य मराठी

दि. ३० ऑगस्ट, २०१९

**दिव्य मराठी विशेष** • प्रथमच आगळावेगळा प्रयत्न, महाविद्यालय करते संपूर्ण खर्च, वीस विद्यार्थिनींनी घेतला प्रवेश

# पाटील महाविद्यालयामध्ये फिल्म मेकिंगचा कोर्स

प्रतिनिधी । सोलापूर

प्रत्येक रसिकाला चंदेरी दुनियेचा वेड असतं. कुणाला अभिनयाची, कुणाला संगीताची तर कुणाला चित्रपट पाहण्याची आवड असते. युवती आणि मुलींमधील या कलागुणांना वाव देण्यासाठी सोलापुरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयाने प्रथमच फिल्म मेकिंगचा कोर्स सुरू केला. शहरात अशा प्रकाराचा प्रयत्त प्रथमच होत असून या कोर्सला २० विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब साळुंखे आणि उपप्राचार्य डॉ. रावसाहेब ढवण यांच्या अनोख्या संकल्पनेतून हा कोर्स प्रत्यक्षात उतरला आहे. फिल्ममेकिंग या कोर्सला महाविद्यालयातच तज्ज्ञ प्रशिक्षक पवन बारगजे यांचे प्रशिक्षण मिळत आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून सुरू झालेल्या या प्रशिक्षणामध्ये चित्रपट पाहायचा कसा, ते छायाचित्रण कसे करायचे, त्याचे संकलन कसे करायचे आणि चित्रपटाची कथा-पटकथा-संवाद कसे असावे याबद्दलची संपूर्ण माहिती दिली जात आहे. या कोर्सचे समन्वयक म्हणून डॉ. आनंद शिंदे काम पाहत आहेत. विशेष म्हणजे या कोर्सच्या खर्चाकरिता महाविद्यालयाने आपल्या परीने खर्च करण्याची तयारी दर्शवली आहे. विद्यार्थिनींच्या प्रगतीसाठी हे सकारात्मक पाऊल म्हणता येईल.



ल. भा. पाटील महाविद्यालयातील कोर्समध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.

सोलापुरात अशा प्रकारचे फिल्ममेकिंग प्रशिक्षण मिळणे म्हणजे सोने पे सुहागा आहे. इतका सुंदर विषय अतिशय साध्या सोप्या पद्धतीने हाताळण्यासाठी बारगजे सरांनी आम्हाला उत्तम असे प्रशिक्षण दिले आहे. त्यामुळे आम्ही स्वतःला भाग्यवान समजतो.
**मेघा बोंडगे,** विद्यार्थिनी

शक्यतो महाविद्यालये पारंपरिक शिक्षण देतात. पण पाटील महाविद्यालयाने असा वेगळा उपक्रम सुरू केल्याबद्दल कौतुक वाटले. मुली या कोर्सचा मनापासून आनंद घेत आहे. त्यातच शिकवण्याचा आंनद मिळतो.
**पवन बारगजे,** छायाचित्रणकार

संचार
dailysanchar@gmail.com

दि. ३० ऑगस्ट, २०१९

संचार — संमिश्र

# संकटांना सामोरे जाणे ही यशस्वी उद्योगाची गुरुकिल्ली

शहर संचर

सोलापूर, दि. २९- जीवन जगत असताना अनेक सामाजिक व आर्थिक अडचणी निर्माण होत असतात. अशा अडचणींना आनंदाने सामोरे जाणे हीच यशस्वी उद्योगाची गुरुकिल्ली आहे हे विद्यार्थिनींनी लक्षात घेतले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. गिरीश जाखोटिया यांनी केले. ...न लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त 'यशस्वी उद्योगाची गुरुकिल्ली' या विषयावर आयोजित व्याख्यानमालेत डॉ. जाखोटिया हे बोलत होते. अध्यक्षस्थानी मध्य विभागीय सल्लागार समितीचे अध्यक्ष संजीव पाटील, प्राचार्य डी. जे. साळुंखे उपस्थित होते.

जाखोटिया म्हणाले की, प्रत्येकाची यशाची वाट वेगवेगळी असते. आर्थिक, बौध्दिक, सांस्कृतिक व सामाजिक हे यशाचे चार भाग पडतात. यशस्वी होण्यासाठी बुद्ध्यांक, भावनांक, शक्तांश उद्योजकामध्ये आवश्यक आहेत.

पाटील म्हणाले की, एकवीसावे शतक हे भारतात संधीचे शतक आहे. यशस्वी होण्यासाठी जात, धर्म, पंथ यांचा अडसर राहिलेला नाही. जागतिक बदलात भारतात मुलींसाठी खूप संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने या संधी काबीज करायला हव्यात.

साळुंके यांनी प्रास्ताविकामध्ये संस्थेच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. डॉ. रावसाहेब ढवण यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. देवराव मुंडे यांनी आभार मानले.



सोलापूर : डॉ. गिरीश जाखोटिया यांचा संजीव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डी. जे. साळुंके व अन्य.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

# तरुण भारत

दि. ८ जुलै, २०१९

## ाचार्य डॉ.डी.जे.साळुंखे यांची निवड



**सोलापूर, दि. १४ जुलै -**

रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.जे.साळूंखे यांची नुकतीच नॅक मुल्यांकन कमिटीवर निवड झाली आहे. गेली ३५ वर्षे रयत शिक्षण संस्थेच्या वेगवेगळ्या महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत असताना त्यांनी विभिन्न महाविद्यालयांच्या विकासात मोलाची भर टाकली आहे. त्यांचे अनेक शोधनिंबध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द झाले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या रीक्षा नियंत्रक पदी उत्कृष्ठ कामकाज करुन विद्यापीठास ई-महाराष्ट्रास पुरस्कार डीजीटल विद्यापीठ पुरस्कार मिळवून देऊन, विद्यापीठाची प्रतिमा उंचावण्याचे कार्य केले. त्यांची नॅक मुल्यांकन कमिटीवर निवड झाल्याबद्दल चेअरमन संजीव पाटील, सुहासिनी शहा, स्नेहा सावे, आण्णासाहेब पाटील, तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थीनींनी अभिनंदन केले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. १४ जुलै, २०१९

# लभा' पाटील महाविद्यालयात ऑक्सिपार्क

सोलापूर, ता. १३ : सातरस्ता येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात ऑक्सिपार्कची निर्मिती करण्यात आली आहे. या ऑक्सिपार्कमुळे महाविद्यालय परिसरात आनंदी वातावरण आहे. नवीन नॅक प्रणालीत ऑक्सिपार्क ही संकल्पना महाविद्यालयांना देण्यात आली आहे. त्यानुसार या महाविद्यालयाने तुळशीचे ऑक्सिपार्क तयार केले आहे.

ऑक्सिपार्क येथे मधल्या सुटीत विद्यार्थिनी जेवणाचा आनंद घेतात. तुळस ही पर्यावरण रक्षक आणि औषधी गुणांनी भरलेले बहुपयोगी रोपटे असून तुळशीत पर्यावरण शुद्ध करण्याचा गुणधर्म आहे. तुळशीच्या आसपास रोगसंक्रमक जीवजंतूचे प्रमाण कमी असते. त्यामुळे महाविद्यालयाच्या आवारात निरोगी व आल्हाददायक नैसर्गिक वातावरण राहण्यासाठी तुळशी पार्कची निर्मिती करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे यांनी दिली. डॉ. मल्लिनाथ अंजुनगीकर, डॉ. रावसाहेब ढवण, डॉ. सुरेश ढेरे व नॅकचे समन्वयक डॉ. संतोष राजगुरू यांच्या संकल्पनेतून महाविद्यालयात तुळशीच्या ऑक्सिपार्क निर्मिती झाली.



सोलापूर : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात साकारण्यात आलेल्या ऑक्सिपार्कसोबत विद्यार्थिनी व शिक्षक.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

दि. १५ जुलै, २०१९

# वाढती लोकसंख्या प्रगतीला अडथळा

## येळेगावकर : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** :देशात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत चालली असून, त्यामुळे समाजात अनेक समस्या वाढत आहेत. त्याचा अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण आदी भौतिक सुविधांवर ताण पडून, शासकीय उपाययोजनांची परिणामकारकता कमी होत चालली आहे.

वाढती लोकसंख्या देशाच्या प्रगतीसाठी अडथळा ठरत आहे म्हणून तरुणांनी लोकसंख्या वाढीचे परिणाम समजून घेतले पाहिजेत आणि लोकसंख्या नियंत्रणासाठी उपाय केले पाहिजेत. देशाच्या प्रगतीसाठी लोकसंख्येपेक्षा लोकांची गुणवत्ता वाढली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर. व्यासपीठावर डॉ. संतोष राजगुरु, डॉ. दादासाहेब साळुंखे, प्रा. अंजुनगीकर आदी.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. मल्लिनाथ अंजुनगीकर होते. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. आनंद शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. नागोराव भुरके यांनी आभार मानले

पुढारी
www.pudhari.com

दि. १५ जुलै, २०१९



सोलापूर : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयात ऑक्सीपार्क तयार केला आहे.

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात 'ऑक्सीपार्क'

**सोलापूर :** सातरस्ता येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात 'ऑक्सीपार्क' फुलला असून विद्यार्थिनी, पालक व प्राध्यापकांत आनंदी व उत्साहवर्धक वातावरण पसरले आहे. नवीन 'नॅक' प्रणालीमध्ये 'ऑक्सीपार्क' ही संकल्पना असल्याने महाविद्यालयाने तुळशीचे हे ऑक्सीपार्क तयार केले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थिनी या पार्कमध्ये मधल्या सुट्टीत बसून जेवणाचा आनंद घेतात. तुळस हे पर्यावरण रक्षक आणि औषधी गुणांनी भरलेले बहुपयोगी रोपटे आहे. तुळशीमध्ये पर्यावरणाची शुद्धी करण्याचा गुणधर्म असल्याने तुळशीच्या आसपास रोगसंक्रमक जीवजंतूचे प्रमाण कमी असते. त्यामुळे महाविद्यालयाच्या आवारात निरोगी व आल्हाददायक असे नैसर्गिक वातावरण निर्माण झाल्याने हे तुळशी पार्क विद्यार्थिनी व पालकांत कुतूहलाचा विषय बनला आहे. या संकल्पनेसाठी प्राचार्य डॉ. डी.जे. साळुंखे, डॉ. मल्लिनाथ अंजुनगीकर, डॉ. रावसाहेब ढवण, डॉ. सुरेश ढेरे व नॅकचे समन्वयक डॉ. संतोष राजगुरू यांची प्रेरणा महत्त्वाची ठरली आहे.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

संचार

dailysanchar@gmail.com

दि. १७ जुलै, २०१९



# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात गुरुपौर्णिमा

सोलापूर : सातरस्ता येथील रयत शिक्षण संस्थेचे लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात गुरुपौर्णिमा कार्यक्रम विद्यार्थिनिंनी साजरा केला. आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा म्हणतात. हे गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारे भारतातील सणापैकी एक आहे. याप्रसंगी डॉ. रावसाहेब ढवण यांनी विद्यार्थिनिंना यशस्वी जीवन जगण्यासाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. यासाठी प्राचार्य डॉ. डी.जे. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. संतोष राजगुरू, प्रा. देवराव मुंडे व डॉ. मनीषा टांक यांनी आपली मनोगते व्यक्त केली. तर, पूनम पवार, संपदा पानसे, साक्षी घंटे, वैष्णवी कुंभार, पौर्णिमा लोहकरे या विद्यार्थिनिंनी शुभेच्छापर भाषणे केली. प्रा. मोहन चव्हाण, डॉ. विजय रेवजे, प्रा. अनिल कांबळे, डॉ. नागोराव भुरके उपस्थित होते.

महाराष्ट्राचा मानबिंदू
**लोकमत**

**दि. २४ जुलै, २०१९**

एलबीपी'स देणगी : देविदास कोकणेंचा मृत्यूआधीचा शब्द

# पगारातील शिल्लक अडीच लाख रुपये गरीब, गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी

लोकमत न्यूजनेटवर्क

**सोलापूर :** बालपणापासून लक्ष्मी उद्योग समूहात नोकरी करीत असताना देविदास कोकणे यांनी आलेल्या पगारातून पैसे वाचवत २ लाख ५१ हजार रुपये जमवले. जमवलेली रक्कम त्यांनी गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मदत म्हणून उद्योगपती अण्णासाहेब पाटील यांच्याकडे सुपूर्द केली. त्यांच्या निधनानंतर ही रक्कम लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी खर्च करणार असल्याचे उद्योगपती अण्णासाहेब पाटील यांनी जाहीर केले.



परशुराम कोकणे यांच्या मृत्यूनंतर २ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब साळुंखे यांच्याकडे सुपूर्द करताना उद्योगपती अण्णासाहेब पाटील. छायाचित्रात उद्योजक मिहीर पाटील, डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ. रावसाहेब ढवण आदी.

सात रस्ता येथील रयत शिक्षण संस्थेच्या एलबीपी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दादासाहेब साळुंखे होते. अण्णासाहेब पाटील म्हणाले, देविदास कोकणे यांचे संगोपन स्व. कलगोंडा पाटील यांनी केले. कोकणे यांना लक्ष्मी उद्योग समूहात सामावून घेण्यात आले. त्यांचे आणि पाटील कुटुंबाचे जिव्हाळ्याचे संबंध होते. पगारातून शिल्लक पडलेली रक्कम जमा करीत कोकणे यांनी वृद्धापकाळात माझ्याकडे रक्कम दिली. त्यानंतर त्यांचे नुकतेच निधन झाले. ही रक्कम गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याची त्यांची माझ्याकडे इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार ही रक्कम मी महाविद्यालयास देत आहे.

प्रास्ताविक डॉ. रावसाहेब ढवण यांनी केले. आभार डॉ. देवराव मुंडे यांनी मानले. यावेळी डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, उद्योजक मिहीर पाटील, डॉ. रावसाहेब ढवण, प्रा. डॉ. संतोष राजगुरू, प्रा. मोहन चव्हाण, प्रा. भक्तराज जाधव आदी उपस्थित होते.

## व्याख्यानमालेचा विचार

- जयकुमार पाटील यांच्या स्मरणार्थ औद्योगिक विषयावर व्याख्यानमाला सुरु करण्याचा मानस असून, वाणिज्य विभागात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास त्यांच्या नावे गोल्ड मेडल देण्यात येईल, असे प्राचार्य दादासाहेब साळुंखे म्हणाले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

संचार

dailysanchar@gmail.com

दि. ३१ जुलै, २०१९

# विद्यार्थिनींनी आत्मनिर्भरतेतून स्मार्ट बनण्याची आवश्यकता

**शहर संचार**

**सोलापूर, दि. ३०-** कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवन जगताना येणाऱ्या शारीरिक, मानसिक व सामाजिक समस्यांना सामोरे जाताना विद्यार्थिनींनी आत्मनिर्भरतेतून स्मार्ट बनावे असे आवाहन लक्ष्मी उद्योग समूहाच्या संचालिका उल्का पाटील यांनी केले.

मोदीखाना येथील लक्ष्मीबाई पाटील महिला महाविद्यालयात 'स्मार्ट गर्ल्स' अभियानांतर्गत आयोजित दोनदिवसीय कार्यशाळेच्या समारोपात पाटील या बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे, कामिनी गांधी, सुवर्णा कटारे, जयश्री चोरडिया, प्रा. मोनाली डावरे, प्रा. वृषाली सापटणेकर आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाल्या की, विद्यार्थिनींनी स्वत:ला ओळखून सकारात्मक बदल व सुधारणा करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. आपला आत्मसन्मान जपत, आत्मविश्वासाने स्वसंरक्षणासाठी पुढे आले पाहिजे.

डॉ. साळुंखे म्हणाले, विद्यार्थिनींनी आत्मसन्मान व स्वसंरक्षणासाठी स्वत:ला सिध्द करण्याचा सध्याचा काळ आहे. प्रास्ताविक डॉ. रावसाहेब ढवण यांनी केले तर आभार प्रा. अर्चना रामपुरे यांनी मानले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

सकाळ

दि. ३१ जुलै, २०१९

# मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'एलबीपीएम'मध्ये मार्गदर्शन

**सोलापूर, ता. ३० :** भारतीय जैन संघटना व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय (एलबीपीएम) यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'स्मार्ट गर्ल टू बी हॅप्पी टू बी स्ट्राँग' कार्यक्रम झाला. मुली आणि त्यांच्या पालकांसाठी दोन दिवस कार्यक्रम झाला.

कार्यक्रमात मुलींना आत्म जाणीव करून देणे, संवाद आणि नातेसंबंध ओळखणे, स्वसंरक्षण व आत्मसन्मान याची जाणीव करून देणे, आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोचणे, पाल्यांनी बालकांना समजून घेणे, अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. भारतीय जैन संघटनेच्या विभागीय अध्यक्षा मास्टर ट्रेनर- स्मार्ट गर्ल्स प्रोग्रामच्या सुवर्णा कटारे, औरंगाबाद शाखेच्या महिलाध्यक्षा जयश्री चोरडिया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब साळुंखे उपस्थित होते. डॉ. रावसाहेब ढवण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. माधुरी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मोनाली डावरे यांनी आभार मानले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
प्रसिद्धी विभाग

# तरुण भारत

दि. ३१ जुलै, २०१९



## विद्यार्थिनींने आत्मनिर्भरतेतून स्मार्ट व्हावे

### उल्का पाटील यांचे मत; लक्ष्मीबाई पाटील महाविद्यालयात कार्यशाळा

सोलापूर, दि. ३० जुलै-

कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवन जगताना येणाऱ्या शारिरिक आणि मानसिक व सामाजिक समस्यांना सामोरे जाताना विद्यार्थीनींनी स्वत:ला ओळखून सकारात्मक बदल व सुधारणा करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. आपला आत्मसन्मान जपत, आत्मविश्वासाने स्वसंरक्षण करण्यासाठी आत्मनिर्भर व्हावे असे प्रतिपादन लक्ष्मी उद्योग समूहाच्या संचालिका उल्का पाटील यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या महिला महाविद्यालयात व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त विद्यमानातून स्मार्ट गर्ल्स अभियानांतर्गत आयोजित कार्यशाळा समारोप कराताना उल्का पाटील बोलत होत्या त्या म्हणाल्या की, स्वातंत्र्यासोबत अधिक जबाबदारी येते व जबाबदार बनल्यामुळे स्वातंत्र्य मिळण्याची शक्यता वाढते.

केतन शहा म्हणाले की, विद्यार्थीनींनी आपली बलस्ने ओळखून आपल्या महत्वकांक्षा पूर्ण करण्यसाठी प्रयत्न केले पाहिजे. यांप्रसंगी व्यासपिठावर कामिनी गांधी, सुवर्णा कटारे, जयश्री चोरडिया, प्रा. मोनाली डावरे, प्रा. वृषाली सापटणेकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रावसाहेब ढवण यांनी केले.